# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी ४११ ०१८
## जाहिरात क्र. ९३/२०१३
## नगरसचिव, प्रशासन अधिकारी पदे सरळसेवेने भरणेबाबत
## निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील नगरसचिव व प्रशासन अधिकारी या अभिनामाची पदे सरळसेवेने भरण्यासाठी दिनांक ३०/०७/२०१३ रोजीचे दै.लोकमत, दै.पुढारी व दै.सामना या वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात क्रमांक ९३/२०१३, प्रसिध्द करून पात्रताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत. सदर जाहिरातीमध्ये प्रसिध्द झालेल्या अट क्रमांक २७ मध्ये पुढीलप्रमाणे अतिरिक्त मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे.

"पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचा-यांना सदर अट लागू राहणार नाही. त्या व्यतिरिक्त अन्य शासकीय/नियशासकीय कार्यालयामधील जे कर्मचारी दिनांक १/११/२००५ पूर्वी सेवेत दाखल झाले आहेत अशा कर्मचा-यांनी अर्ज केल्यास, संबंधित शासकीय/नियशासकीय कार्यालयांनी, अशा कर्मचा-यांचे सेवानिवृत्ती वेतन अंशदान (पेन्शन कॉंट्र्युब्युशन) व रजा वेतन अंशदान (लिव्ह सॅलरी कॉंट्र्युब्युशन) ची रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग केल्यास अशा कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ नुसार निवृत्तीवेतन योजना लागू राहील. तसेच संबंधित शासकीय/निमशासकीय कार्यालयांकडे जमा असणारी भविष्य निर्वाह निधीची व्याजासह रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग केल्यास, त्यांना महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ प्रमाणे भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहील अन्यथा सदर कर्मचा-यांस नवीन नियुक्तीपासून वरील नियमाप्रमाणे नवीन भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक देण्यात येईल".

(डॉ.श्रीकर परदेशी)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्र.प्रशा/१/कावि/९०५७/२०१३
दिनांक०७/०८/२०१३